**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.**

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १६

**सभावृत्तांत**

**दिनांक – ११/०१/२०१९** **वेळ – सकाळी ११.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **११/०१/२०१९** रोजी **सकाळी ११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.संजय बबन नेवाळे - सभापती**
२. मा.शैलेश ऊर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
३. मा.सुजाता सुनिल पालांडे
४. मा.गोफणे अनुराधा देविदास
५. मा.अपर्णा निलेश डोके
६. मा.संजय मल्हारराव वाबळे

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.राऊत – प्र.सहा.आयुक्त, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.४) प्रभाग क्र.१७ मधील गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा शिवशक्ती महिला बचत गटास सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मुदतवाढ देणेबाबत – मा.शैलेश मोरे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) मनपाचा पिंपरी येथील काशिबा शिंदे बॅडमिंटन हॉल हा मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्थेस ५ वर्षे भाडे कराराने चालविण्यास देणेबाबत – मा.शैलेश मोरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड शहरातील पुनावळे व्यायामशाळा CAPSTONE SPORTS & FITNESS यांना ३ वर्षे कराराने चालविण्यास देण्यास मान्यता देणेबाबत - मा.शैलेंद्र मोरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २८/१२/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक १५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ६९ विषय क्रमांक – ०१

दिनांक – ११/०१/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/५८४/२०१८, दि.२९/१०/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.नंदकुमार कचेश्वर रोकडे, लॉन टेनिस प्रशिक्षक यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सेक्टर क्र. २५ येथील लॉनटेनिस क्ले कोर्ट भाडे कराराने चालविण्याचे द्यावयाचे झाल्यास महिन्याचे एका कोर्टचे र.रू.५०००/- व दोन कोर्टचे र.रु.१०,०००/- भाडे आकारून संबंधीत व्यक्ती / संस्था / मंडळे यांच्याकडून र.रू.२०,०००/- अनामत रक्कमेचा एफ.डी.आर. मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे नावे घेऊन प्रस्तावात नमुद अटी शर्ती नुसार व लॉनटेनिस कोर्ट भाडे कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७० विषय क्रमांक – ०२

दिनांक – ११/०१/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.अनुराधा गोफणे अनुमोदक – मा.अपर्णा डोके

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/३/कावि/४९९/२०१८, दि.२४/१२/२०१८

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाची राजमाता जिजाऊ व्यायामशाळा काकडे पार्क चिंचवड हि काकडे पार्क मित्र मंडळ चिंचवड यांना सेवाशुल्क तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास दिलेल्या व्यायाम शाळाची मुदत दि.०२/११/२०१८ रोजी संपुष्टात आल्याने त्यांना आदेशाच्या तारखेपासून मुदतवाढ देणेकामी व ११ महिने कराराने दरमहा सेवाशुल्क र.रू.२०००/- मनपाकडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस तसेच १) चिंचवड प्रभाग क्र.१८ मधील तानाजी गावडे व्यायामशाळा अजित स्वयंरोजगार संस्थेस ११ महिने कराराने चालविणेस देणेस तसेच २) संत तुकारामनगर मधील जिजाऊ सांस्कृतिक भवनमधील व्यायामशाळा हनुमान जिम या संस्थेस ११ महिने कराराने चालविणेस देणेस तसेच ३) सखुबाई गवळी उद्यानातील जिम संस्कृती महिला स्वयंरोजगार संस्था या संस्थेस ११ महिने कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७१ विषय क्रमांक – ०३

दिनांक – ११/०१/२०१९ विभाग - क्रीडा

सुचक – मा.सुजाता पालांडे अनुमोदक – मा.शैलेश मोरे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/६४४/२०१८, दि.३१/१२/२०१८

विषय - मे.सुमित स्पोर्ट्स अँन्ड फिटनेस इक्विपमेंट्स, चिंचवड पुणे १९ यांना भोसरी जलतरण तलाव पाणी शुद्धिकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दुरूस्ती कामकाज मुदतवाढ देणे.

विषय क्रमांक ०३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७२ विषय क्रमांक – ०४

दिनांक – ११/०१/२०१९

सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.अनुराधा गोफणे

संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा.अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव –

पिं.चिं.मनपाची प्रभाग क्र.१७ मधील गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा आदेश क्रमांक क्रीडा/३/कावि/१२२/२०१८, दि.११/०४/२०१८ अन्वये शिवशक्ती महिला बचत गटास दिनांक ११/०४/२०१८ ते १०/०३/२०१९ पर्यंत सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास दिलेली असून सदर मुदत दिनांक १०/०३/२०१९ रोजी संपत आहे. शिवशक्ती महिला बचत गटाने व्यायाम शाळेचे केलेले उत्कृष्ठ व्यवस्थापन लक्षात घेता गुरुवर्य दादोजी कोंडदेव व्यायामशाळा शिवशक्ती महिला बचत गटास सेवाशुल्क तत्वावर चालविणेस देणेकामी मुदतवाढ देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७३ विषय क्रमांक – ०५

दिनांक – ११/०१/२०१९

सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

मनपाचा संत तुकारामनगर येथील सरदास वल्लभभाई पटेल बॅडमिंटन हॉल पिंपरी १८ हा युनिट वेलफेअर अन्ड सोशल फौंडेशन या संस्थेस दरमहा र.रु.१२,८५०/- जीएसटी सह भाडे आकारुन ५ वर्षे भाडे कराराने चालविण्यास दिलेले आहे. याच धर्तीवर मनपाचा पिंपरीगाव येथील काशिबा शिंदे बॅडमिंटन हॉल पिंपरी १८ हा मैत्री स्वयंरोजगार सेवा संस्था या संस्थेस ५ वर्षे भाडे कराराने दरवर्षी १० टक्के भाडेवाढ करुन चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७४ विषय क्रमांक – ०६

दिनांक – ११/०१/२०१९

सुचक – मा.शैलेश मोरे अनुमोदक – मा.सुजाता पालांडे

संदर्भ – मा.शैलेश मोरे, मा.सुजाता पालांडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील पुनावळे व्यायामशाळा CAPSTONE SPORTS & FITNESS यांना ३ वर्षे कराराने मनपाकडून र.रु.२,०००/- सेवाशुल्क घेऊन चालविण्यास देण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( संजय बबन नेवाळे )**
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२७/२०१९
दिनांक : ११/०१/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.